# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता. १५/०६/२०२०

**पिंपळे निलख परिसरात दहशत पसरविण्याच्या उद्देशाने एका इसमास गंभीर जखमी करुन चार चाकी वाहनाची तोडफोड करणाऱ्या टोळक्याच्या गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड यांनी ०४ तासाच्या आत आवळल्या मुसक्या**

दिनांक १४/०६/२०२० रोजी रात्री १०:०० वाजण्याच्या सुमारास खंडोबा मंदिर पिंपळे निलख येथे फिर्यादी नामे राजकुमार आरसन पिल्ले, वय- २५ वर्षे, रा- शारदा कॉलनी, पिंपळे निलख, पुणे. हे त्यांचे मित्रासह रस्त्याने घरी जात असताना चैतन्य अहिरे रा- पिंपळे निलख व समीर शेख रा- कस्तुरबा झोपडपट्टी औंध पुणे यांनी त्याचे इतर १० ते १२ अनोळखी साथीदारांसह फिर्यादी यांच्याशी असलेल्या जुन्या भांडणाचे कारणा वरुन फिर्यादी याचे डोक्यावर व उजव्या पायाच्या नडगीवर तलवारी व कोयत्याने वार करुन गंभीर जखमी केले व फिर्यादी यांना वाचवण्यास आलेल्या मित्रांनाही मारहाण केली. तसेच परिसरात दहशत माजवण्याच्या उद्देशाने ०७ ते ०८ चारचाकी वाहनांच्या काचा तलवार व कोयत्याने फोडुन नुकासन केले. सदर बाबत सांगवी पोलीस ठाणे येथे गु.र.नंबर-३११/२०२० भा.दं.वि. कलम ३२६,३२३, ४२७,१४३,१४७,१४८,१४९, ५०४,५०६ आर्म ॲक्ट ४(२५) (२७) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची घटना ही दहशत माजवण्याच्या उद्देशाने घडली असल्याने व त्यामुळे परिसरात भितीचे वातावरण पसरले असल्याने पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेस तातडीने तपास करुन आरोपी निष्पन्न करुन आरोपी अटक करण्याचे आदेश दिले.

त्या अनुशंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट- ४, पिंपरी चिंचवड चे सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख व स्टाफने सदर प्रकरणाचा तात्काळ समांतर तपास सुरु केला. सदरचे आरोपी हे गुन्हा करुन फरार झाले असल्याने व बरेचशे आरोपी अनोळखी असल्याने त्यांचा शोध घेण्यास अडचण निर्माण झाली. तेव्हा सर्व खबऱ्यांना सतर्क करुन माहिती काढण्याचा प्रयत्न केला असता बातमीदाराकडुन माहिती मिळाली की यातील मुख्य आरोपी हा विधीसंघर्षीत बालक असुन तो त्याच्या एका साथीदारासह पिंपळे निलख स्मशानभुमी जवळ लपला आहे. त्यानुसार सदर ठिकाणा वरुन वि.सं.बालक व गुन्हयातील त्याचा साथीदार असलेला दुसरा वि.सं.बालक या दोघांना ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्या दोघांनी त्यांचे इतर साथीदारांसह सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्या कडे केलेल्या चौकशीतुन गुन्हयात सहभागी असलेले आरोपी नामे १) कुणाल राजेंद्र सरतापे, वय- २० वर्षे, रा- कस्तुरबा गांधी वसाहात, बौध्द विहार, औंध, पुणे २) चेतन रामनवल साहानी, वय- २२ वर्षे, रा- कस्तुरबा गांधी वसाहात, बौध्द विहार, औंध, पुणे ३) रोहन कुमार जोगदंड, वय- २२ वर्षे, रा- इंदिरा वसाहात, आंबेडकर चौक, औंध, ४) यशवंत सुनिल अवघडे, वय- २१ वर्षे, रा- इंदिरा वसाहात, आंबेडकर चौक, औंध, आणि ०७ विधीसंघर्षीत बालकांना गुन्हा दाखल झाल्या पासुन अवघ्या ०४ तासात दिवस उजाडल्या बरोबर शिताफिने ताब्यात घेवुन पुढील कारवाई कामी सांगवी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले.

यातील मुख्य आरोपी असलेला विधीसंघर्षीत बालक व फिर्यादी यांच्यात अंदाजे ०१ महिन्यापुर्वी झालेल्या किरकोळ भांडणाचे कारणातुन सदर वि.सं.बालकाने त्याचे इतर साथीदारांना बोलावुन घेवुन फिर्यादी यांना मारहाण केल्याचे व परिसरात दहशत माजवण्याच्या उद्देशाने वाहनांची तोडफोड केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील, गुन्हे- १ यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहा.पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ संजय गवारे, नारायण जाधव, प्रविण दळे, धर्मराज आवटे, पोना/, लक्ष्मण आढारी, तुषार शेटे, संतोष असवले, मोहम्मद गौस नदाफ, वासुदेव मुंडे, पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, तुषार काळे, सुरेश जायभाये, धनाजी शिंदे, आदिनाथ ओंबासे व नागेश माळी, राजेंद्र शेटे तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा यांनी केली आहे. गुन्हे शाखा यांनी केली आहे.

